N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 173 B.N.S.S)**

**प्रथम खबर अहवाल**

**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

**1.** **District (जिल्हा):** पुणे शहर

**P.S. (पोलीस ठाणे):** येरवडा **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0100

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 05/02/2025 03:20 वाजता

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मंगळवार

**Date from (दिनांक पासून):** 04/02/2025

**Date To (दिनांक पर्यंत):** 04/02/2025

**Time Period (कालावधी):**

**Time From (वेळेपासून):** 16:00 तास

**Time To (वेळेपर्यंत):** 18:30 तास

**(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):**

**Date (दिनांक):** 05/02/2025

**Time (वेळ):** 02:37 तास

**(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 007

**Date and Time (दिनांक आणि वेळ):** 05/02/2025 02:37 तास

**4.** **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5.** **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. (a) **Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 01 कि.मी.

**Beat No. (बीट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** येरवडा जीएसटी, येरवडा पुणे,

(c) **In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6.**



Scanned with CamScanner

Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): श्री. अॅड. सौरभ विजय भालेराव

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1998

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लॅट नं 1207, बि विंग, बागेश्री नांदेड सिटी, पुणे, येरवडा, पुणे शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | प्लॅट नं 1207, बि विंग, बागेश्री नांदेड सिटी, पुणे, येरवडा, पुणे शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-7757978584



Scanned with CamScanner

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | तुषारकुमार दत्तात्रय माळी | | | 1. ए/202,राजलक्ष्मी रेसीडेन्सी,सदाशीव दांगटनगर,आंबेगाव, Town/Village (शहर / गाव): बुद्रुक,पुणे,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): येरवडा,District (जिल्हा): पुणे शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5,000/ रुपये | 5,000.00 |

10. Total value of property (In Rs/-) मालमतेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) : 5,000.00

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

जबाब दिनांक 04/02/2025

मी श्री. सौरभ विजय भालेराव , वय- 27 वर्षे, धंदा- वकील , रा. प्लॅट नं 1207, बि विंग, बागेश्री नांदेड सिटी, पुणे मो.नं 7757978584



Scanned with CamScanner

मी वरील ठिकाणी माझे आई वडील यांचे सोबत राहणेस असुन मी व्यवसायाने वकील आहे. तसेच मी जिएसटी प्रॅक्टीशनर असुन माझा सीओपी नं 272100016882जीपीएल असा आहे. मी जीएसटी संदर्भातील प्रकरणांची कामे करतो. माझे एक आशिल नामे सौ. सोनाली ज्ञानदेव सोलंकर यांचा जीएसटी नं 27GFNPS1529Q1ZFअसा असुन त्यांचा व्यवसायाचे नाव समर्थ ऑटोमेशन असे आहे. सदर माझ्या आशिलाचा वरील नमुद जीएसटी क्रं स्टेट टॅक्स ऑफीसर यांनी दिनांक 03/01/2025 रोजी सहा महीन्याचे रिर्टन्स न भरल्याने बंद केला होता. सदरचा जीएसटी क्रं चालु करण्यासाठी सौ.सोनाली सोलंकर यांनी मला संपर्क करुन तात्काळ सदरचा जिएसटी क्रं चालु करण्यासाठी मला सांगीतले. त्यावरुन मी दि.18/01/025 रोजी ऑन लाईन पध्दतीने अर्ज केला होता. त्याबाबतीतल्या सर्व अटी मी पुर्ण केल्या होत्या, परंतु त्या अर्जावरुन जीएसटी क्रं चालु न झाल्याने मी माझेसोबत काम करणारे माझे सहकारी अॅड.तेजस्वी जोशी यांना येरवडा येथील वस्तु व सेवा कर भवन येरवडा या कार्यालयात पाठविले होते. त्यावेळेस सदर कार्यालयात चौकशी केली असता तेथील एक अधिकारी तुषार माळी यांचेकडे सदरचे प्रकरण असल्याचे समजले, म्हणुन माझे सहकारी तेजस्वी जोशी या त्यांना भेटले असता, तुषार माळी यांनी जीएसटी क्र पुन्हा चालु करण्यासाठी 5000/-रुपयांची मागणी केली म्हणुन माझे सहकारी तेजस्वी जोशी यांनी मला फोन लावुन दिला. सदर फोनवर मी तुषार माळी यांचेशी बोललो असता त्यांनी मला फोनवर पुन्हा 5000/-रुपयांची लाचेची मागणी केली. परंतु मला पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी माझे आशिल सौ. सोनाली सोलंकर यांना सदरची बाब सांगीतली व मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचकडे वस्तु व सेवा कर भवन येरवडा या कार्यालयात काम करणारे तुषार माळी यांचेविरुध्द तक्रार करणार असल्याचे सांगीतले त्यांनी मला सदर तक्रार करण्याबाबत सहमती दिली, म्हणुन मी आशिलाच्या वतीने दिनांक 31/01/2025 रोजी सायंकाळी 4.30 वाजता लेखी तक्रार केली होती.

माझे तक्रारीचे अनुषंगाणे लाप्रवि,पुणे विभागाचे पोनि प्रसाद लोणारे यांनी दिनांक 31/01/2025 रोजी माझी ओळख पंच यांचेशी करुन देवुन पंचासमक्ष माझी लेखी तक्रार नोंदवली. परंतु सदर दिवशी कार्यालयीन वेळ संपल्यामुळे कारवाइ करता आली नाही. दि. 01/02/2025 व 02/02/2025 असे दोन दिवस सुटटी असल्याने तसेच माझे दि. 03/02/2025 रोजी महत्वाचे काम असल्याने दि. 04/02/2025 रोजी सदरची कारवाई करण्याची मी पोनि लोणारे यांना विनंती केली. व त्यावरुन दि. 04/02/2025 रोजी कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले. दि. 04/02/2025 रोजी पोनि लोणारे यांनी लाप्रवि कार्यालयातुनच सदरची कारवाई करण्याचे ठरविले व माझे तक्रारी वरुन वस्तु व सेवा कर भवन येरवडा या कार्यालयात काम करणारे तुषार माळी हे लाचेची मागणी करतात का याची खात्री करण्याकरीता पडताळणी करण्याचे पोलीस निरीक्षक श्री. प्रसाद लोणारे यांनी ठरवले.त्यानुसार पंच क्रं 01 श्री. सचिन भारत वायाळ, वय 35 वर्षे, धंदा –नोकरी, पद - वरिष्ठ लिपीक, कृषी आयुक्तालय, पुणे रा. के/ऑ प्रकाश भुजबळ, पुण्याई बिल्डींग, क्रांती चौक, नवी सांगवी, पुणे मो. 8669078125 व माझे निवेदणे व्हॉईस रेकॉर्डमध्ये ध्वनिमुद्रीत केले व सदरचा व्हॉईस रेकॉर्डर माझ्या शर्टच्या खिशात ठेवुन मला पडताळणी कामी वस्तु व सेवा कर भवन येरवडा या कार्यालय येथे पाठवले. त्यांनंतर माझेकडील खाजगी दुचाकी क्रं एमएच 12 आरजे 3709 या वाहनावरुन लोकसेवक माळी यांची भेट घेणेकामी पंच क्र.1 श्री. सचिन वायाळ यांचेसह रवाना केले व बाकीचे सापळा पथक हे लाप्रवि, पुणे कार्यालयात थांबून राहिले. काही वेळाने मी व पंच नं-1 हे लाप्रवि, पुणे कार्यालयात परत आलो. पोनि



Scanned with CamScanner

लोणारे यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर पोनि लोणारे यांनी मला पडताळणी कारवाईकामी रवाना केलेपासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारले असता मी सांगीतले की, मी व पंच क्रं 1 असे माझे दुचाकी वाहनाने जीएसटी कार्यालय, येरवडा येथे गेलो, कार्यालयामध्ये श्री माळी हे कार्यालयात उपस्थीत नसल्याने मी कार्यालयातील इतर कर्मचारी यांना माळी यांचेबाबत विचारणा केली, त्यावेळी त्यांनी माळी हे चहा पिण्यासाठी बाहेर गेले असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी व पंच क्रं 1 कार्यालयाच्या बाहेर आलो. मी माझा मो.क्रं. 7757978584 यावरुन माळी यांचा मो.क्रं.9420942445 यावर फोन करुन स्पिकर फोन ऑन केला त्यावेळी माळी यांनी फोन रिसीव्ह केला असता, मी माळी यांना माझी ओळख सांगुन कार्यालयात आलो असलेबाबत सांगीतले. त्यावेळी माळी यांनी 10 मीनीटे थांबा मी येत आहे असे सांगुन फोन कट केला. त्यावेळी मी व पंच क्रं 1 त्यांची वाट पाहत कार्यालयाच्या बाहेर थांबुन राहिलो. काहिवेळात सदर ठिकाणी एक इसम आले व त्यांनी मला तुम्ही भालेराव का अशी विचारणा केली व त्यांचेसोबत कार्यालयात येण्याबाबत सांगीतले. त्यावेळी मी पंच क्रं 1 यांना हेच माळी असलेबाबत मला इशा-याने सांगीतले. त्यानंतर मी, पंच क्रं 1 व माळी असे जीएसटी ऑफिसमधील माळी यांचे टेबलजवळ गेलो. त्यानंतर मी माळी यांचेसोबत माझे अशीलांच्या प्रलंबीत कामासंदर्भात चर्चा केली. त्यावेळी माळी यांनी माझ्याकडे पंच क्रं 1 यांच्याबाबत विचारणा केली. त्यावेळी मी माळी यांना ते माझे क्लायंट असुन त्यांचे जीएसटीचे काम असल्याने ते माझेसोबत आले आहेत असे सांगीतले. त्यावेळी माळी यांनी पंच क्रं 1 यांना बाहेर थांबण्यास सांगीतले असता, पंच क्रं 1 हे कार्यालयाच्या बाहेर जाऊन थांबले. त्यानंतर पुन्हा मी माळी साहेबांसोबत माझे प्रलंबीत कामासंदर्भात चर्चा करीत असताना माळी साहेब यांनी मला डॉक्युमेंटेशनच केल का डन असे म्हणत हाताने लाच रकमेबाबचा इशारा केला. त्यावेळी मी त्यांना अच्छा अच्छा, ओके ओके पण तुम्ही मला अमाऊंट सांगीतली नाही सर असे बोललो त्यावर त्यांनी मला पाच म्हटल असे सांगीतले. त्यावर मी त्यांना पाच-पाच हजार असे बोललो असता, ते मला हं असे म्हणुन माझेकडे 5000/- रुपये लाच रकमेची मागणी करुन तुमचे काम आजच्या आज करुन देतो असे सांगीतले त्यानंतर पुन्हा आमचेमध्ये माझे अशीलाच्या प्रलंबीत कामासंदर्भात चर्चा झाली. त्यानंतर मी सदर ठिकाणाहुन निघत असताना मला माळी यांनी साडेपाच वाजेपर्यंत येऊन जावा असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना होकार देऊन सदर ठिकाणाहुन निघुन कार्यालयाच्या बाहेर उभ्या असलेल्या पंच क्रं 1 यांना सोबत घेऊन माझे दुचाकीवरुन लाप्रवि, पुणे कार्यालयात परत आलो. अशी हकिकत दोन्ही पंचांसमक्ष सांगीतली. त्यानंतर सापळा कारवाई करीता पोनि लोणारे मला लाच रक्कम म्हणून 5000/- रु हजर करण्याची सुचना केली असता त्यांना मी माझेकडील 5000/- रु दिले त्यात 500 रु दराच्या 10 नोटा होत्या.वरील नमुद नोटांचे नंबर्स पोशि ठाकुर यांनी पंच क्रं 02 श्री. महेश अरविंद खरात, वय 52 वर्षे, धंदा नोकरी, पद कषी पर्यवेक्षक, कृषी आयुक्तालय, पुणे रा. ए/7/504 टेन ईलाईट को-ऑप. हौसींग सोसायटी, पिंपळे गुरव, पुणे यांचे मदतीने एका को-या कागदावर नमूद करुन घेतले त्यावर पंचांनी सदर कागदावर सहया केल्या. त्यानंतर पोनि लोणारे यांचे सुचनेवरुन पोशि/ठाकुर यांनी त्यांचे कार्यालयात दोन्ही पंच साक्षीदार आणि तक्रारदार यांना अल्ट्राव्हॉयोलेट दिवा व अँथ्रासिन पावडर दाखवून कार्यवाहीतील त्यांचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगितले. अँथ्रासिन पावडर लावलेल्या वस्तुंवर अंधारामध्ये अल्ट्रा व्हॉयोलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्या वस्तुवर अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन येते.



Scanned with CamScanner

नेहमीच्या प्रकाशात तशी दिसुन येत नाही. असा या वस्तुंचा गुणधर्म असल्याचे सांगितले. त्यानंतर पोशि/ठाकुर यांनी तक्रारदार यांनी हजर केलेल्या 500/-रु. दराच्या 10 भारतीय चलनी नोटांना प्रथम नेहमीच्या प्रकाशात व नंतर अल्ट्रा व्हॉयोलेट दिव्याच्या प्रकाशात तपासुन दाखविले असता त्या नोटांवर कसलीही चकाकी दिसुन आली नाही त्या नोटा नेहमी सारख्याच दिसल्या. त्यानंतर आमचे सुचनेवरुन सापळा पथकातील पोशि/ठाकुर यांनी 500/- रुपये दराच्या 10 भारतीय चलनी नोटा एका कागदावर ठेवून त्या नोटांच्या दोंन्ही बाजुस कापसाच्या बोळयाने क्रमा-क्रमाने अँथ्रासिन पावडर लावली. त्यानंतर लाप्रवि कार्यालयातील आमचे केबीनमध्ये कृत्रीम अंधार करुन आम्ही पोशि/ठाकुर यांचे हातातील नोटांवर अल्ट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्या सर्व नोटांवर दोन्ही बाजुस अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. तशीच चकाकी पोशि/ठाकुर यांच्या दोन्ही हातांच्या बोंटावर देखील दिसुन आली. त्यानंतर आमचे कार्यालयात पुन्हा उजेड करण्यात आला. पोनि लोणारे यांचे सुचनेवरुन, पोशि/ठाकुर यांनी त्या नोटांची घडी करुन त्या नोटा माझ्या पँटच्या पुढील उजव्या खिशांत ठेवल्या. त्यांनतर पोनि लोणारे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो माझ्या शर्टचे डाव्या खिशात ठेवुन देवुन त्यांना पंच नं. 1 यांचेसोबत रवाना झालो व त्याचवेळी इतर सापळा पथक व पंच नं-2 जीएसटी कार्यालया समोरील सार्वजनीक रोडवर आमचे शासकीय वाहन पार्क करुन तेथुन पायी चालत जीएसटी कार्यालयाकडे गेलो व कोणासही संशय येणार नाही अशा रितीने सापळा· लावुन थांबलो. मी व पंच क्र.1 दुचाकीवरुन जीएसटी कार्यालय, येरवडा येथे आले. कार्यालयाचे बाहेर माझे दुचाकी वाहन पार्क करुन कार्यालयात तुषार माळी यांना भेटण्यास गेलो. तेथे गेल्यावर जीएसटी कार्यालयातील तुषार माळी यांनी भेटलो त्यावेळी माळी यांनी मला लाच रक्कम ही त्यांनी त्यांचे टेबलवर असलेल्या पिवळया रंगाच्या फाईलमध्ये ठेवण्यास सांगीतले यावर मी तुषार माळी यांना म्हणालो की, पाच आहे, मोजुन घ्या यावर माळी यांनी विश्वास आहे असे म्हणाले त्यानंतर मी ठरल्याप्रमाणे लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा पोनि लोणारे यांना केला. पोनि लोणारे, पंच क्रं 2 व सापळा पथक जीएसटी कार्यालयात पोहोचले. त्यावेळी पोशि ठाकुर यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर पोनि लोणारे यांनी मला लाच रक्कम कोणी स्विकारली असे विचारले असता मी कार्यालयातील एका इसमाकडे बोट दाखवुन हेच लोकसेवक तुषार माळी असुन त्यांनी मला लाच रक्कम त्यांचे टेबलवरील पिवळया फाईल मध्ये ठेवण्यास सांगीतल्याने मी सदरची लाच रक्कम फाईलमध्ये ठेवली असल्याचे सांगीतले. त्यावेळी पोनि लोणारे यांनी लोकसेवक तुषार माळी यांना ताब्यात घेतले. पोनि लोणारे यांनी त्यांना त्यांचे पुर्ण नाव-पत्ता विचारले असता त्यांचे नाव तुषारकुमार दत्तात्रय माळी वय 33 वर्षे पद - राज्यकर निरीक्षक, वस्तु व सेवाकर विभाग, येरवडा, पुणे रा.ए/202, राजलक्ष्मी रेसीडेन्सी, सदाशीव दांगटनगर, आंबेगाव बुद्रुक, पुणे असे सांगितले. त्यानंतर पोनि लोणारे यांनी दिलेल्या सुचनेवरुन पंच साक्षीदार क्रमांक 2 श्री. खरात यांनी लोकसेवक श्री. तुषारकुमार माळी यांनी सांगीतल्याप्रमाणे त्यांचे टेबलवरील फाइलमध्ये ठेवलेली लाच रक्कम ताब्यात घेऊन ती मोजली असता त्यामध्ये 500/- रुपये दराच्या 10 नोटा असे एकूण 5,000/- रुपये असल्याचे दिसून आले. त्यानंतर आम्ही सदर लाच रकमेचे नोटांचे नंबर्स सापळापुर्व कारवाई दरम्यान को-या कागदावर लिहीलेल्या नोटांचे नंबरशी पडताळणी केली असता त्या तंतोतंत जुळून आल्या त्यानंतर पोनि लोणारे यांनी मला बाजुला थांबण्यास सूचना केली. त्यानंतर लोकसेवक श्री. तुषारकुमार माळी यांच्या टेबलवरुन लाच रक्कम ठेवलेल्या ताब्यात घेतलेल्या फाईलवर तसेच



Scanned with CamScanner

लाच रकमेवर अल्ट्रा व्हायोलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. सदर फाईल पुराव्याकामी पोनि लोणारे यांनी जप्त केली.

एकंदरीत दि.31/01/2025 रोजी मी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 04/02/025 रोजीच्या झालेल्या पडताळणी व सापळा कारवाईमध्ये तुषारकुमार दत्तात्रय माळी वय 33 वर्षे पद - राज्यकर निरीक्षक, वस्तु व सेवाकर विभाग, येरवडा, पुणे यांनी माझ्या आशिलाचा रदद झालेला जीएसटी क्रं 27GFNPS1529Q1
पुनर्जिवीत करण्यासाठी माझ्याकडे 5000/- रुपयांची मागणी करुन सदरची लाच रक्कम ही पंचासमक्ष स्विकारली म्हणुन माझी तुषारकुमार दत्तात्रय माळी वय 33 वर्षे पद - राज्यकर निरीक्षक, वस्तु व सेवाकर विभाग, येरवडा, पुणे रा.ए/202, राजलक्ष्मी रेसीडेन्सी, सदाशीव दांगटनगर, आंबेगाव बुद्रुक, पुणे यांचे विरुध्द कायदेशीर तक्रार आहे. सदर बाबत पोनि लोणारे साहेब यांनी घडलेल्या सर्व घटनेचा सविस्तर पंचनामा केला आहे.

माझा जबाब मराठी लॅपटॉप वर टाईप केला असून त्याची प्रिट काढुन वाचून पाहिला असता तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

तपाशी अधिकारी --- श्री प्रसाद लोणारे,पोलीस निरीक्षक, अॅ.क.ब्यु. पुणे शहर

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** RAVINDRA DHAIRYASHEEL SHELKE (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**



Scanned with CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - 1)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

**14.** **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** RAVINDRA DHAIRYASHEEL SHELKE

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PBMH72874

**15.** **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

ठाणे अंमलदार
येरवडा पो. स्टे., पुणे शहर.

Scanned with CamScanner